गुरुवार, ३ मार्च २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २२५
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

अंतरंग

रामशेठ ठाकूर विद्यालयात मराठी व विज्ञान दिन/३
विरेश्वर देवस्थानाला पर्यटनाचा दर्जा देणार -प्रवीण दरेकर/५
श्रीलंकेविरुद्ध कसोटीसाठी टीम इंडियामध्ये चुरस/६

## रायगडसह १४ जिल्ह्यांमध्ये कोरोना निर्बंध शिथिल



**मुंबई :** राज्य सरकारने कोरोना प्रतिबंधात्मक बंधने शिथिल करत नवी नियमावली जाहीर केली आहे. या नियमावलीत रायगडसह १४ जिल्ह्यांमध्ये कोरोना निर्बंधांत शिथीलता दिली आहे. ही नवी नियमावली ४ मार्चपासून लागू केली जाणार असल्याचे राज्य सरकारने जाहीर केले आहे. नव्या नियमावलीनुसार राज्यातील १४ जिल्ह्यांमधील नाट्यगृहे, सिनेमागृहे, पर्यटन स्थळे आणि धार्मिक स्थळे १०० टक्के क्षमतेने सुरू करण्यात येत आहेत. तर राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये मात्र मनोरंजन स्थळे आणि पर्यटन तसेच धार्मिक स्थळे ५० टक्के क्षमतेने सुरू राहणार आहेत. मुंबई शहर, मुंबई उपनगरे, पुणे, भंडारा, सिंधुदुर्ग, नागपूर, रायगड, वर्धा, रत्नागिरी, सातारा, सांगली, गोंदिया, चंद्रपूर, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये सिनेमागृहे, रेस्टॉरंट्स १०० टक्के क्षमतेने सुरू होणार आहेत.

### अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला झालेल्या चहापानावर भाजपचा बहिष्कार

# ‘मविआ’च्या अहंकारी नेत्यांना महाराष्ट्र झुकवणारच!

## देवेंद्र फडणवीस यांचा राज्य सरकारला इशारा



**मुंबई : प्रतिनिधी**

मविआचे नेते अलीकडे कोणतीही कारवाई झाली तरी महाराष्ट्र झुकणार नाही, असा डायलॉग मारतात, पण मविआचे नेते म्हणजे महाराष्ट्र नव्हे. राज्यातील १२ कोटी जनता म्हणजे महाराष्ट्र आहे. तुमच्यासारख्या अहंकाऱ्यांना हा महाराष्ट्र झुकवून दाखवेल, अशा शब्दांत विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मविआ सरकारला इशारा दिला. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापानाच्या कार्यक्रमावरही भाजप बहिष्कार टाकत असल्याचे फडणवीसांनी जाहीर केले. ते बुधवारी (दि. २) मुंबईतील पत्रकार परिषदेत बोलत होते.

महाराष्ट्राच्या इतिहासात आजपर्यंत ज्या गोष्टी घडल्या नाहीत, त्या या सरकारच्या काळात घडत आहेत. मुंबई बॉम्बस्फोटाचा मुख्य सूत्रधार असलेल्या दाऊदशी आर्थिक व्यवहाराचा आरोप असलेले मंत्री नवाब मलिक यांना अटक झाली आहे. त्यानंतरही संपूर्ण राज्य सरकार नवाब मलिक यांच्या पाठिशी उभे आहे. ज्यांनी दाऊदला सहकार्य केले, मुंबईच्या खुन्यांशी व्यवहार केले त्यांना वाचवण्यासाठी अख्खे सरकार उभे आहे. पोलीस कोठडीत गेल्यानंतरही एखादी व्यक्ती मंत्रिपदी कायम आहे. हा राज्यघटनेचा अवमान आहे. ज्या सरकारचे प्रमुख शिवसेनेचे नेते आहेत त्यांच्या कार्यकाळात मुंबईच्या खुन्यांसोबत व्यवहार करणाऱ्यांना पाठिशी घातले जात आहे, हे दुर्दैव आहे. मुंबईच्या खुन्यांशी व्यवहार कुठल्याही परिस्थितीत मान्य केला जाऊ शकत नाही. त्यामुळे आम्ही येत्या अधिवेशनात नवाब मलिक यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरणार आहोत. त्यासाठी आम्ही सभागृहात संघर्ष करणार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

या वेळी देवेंद्र फडणवीस यांनी नवाब मलिक यांचा राजीनामा, मराठा-ओबीसी आरक्षण, शेतपंपांची वीज तोडणे आणि भ्रष्टाचाराचे आरोप अशा विविध मुद्द्यांवरून ठाकरे सरकारला लक्ष्य केले.

### मराठा-ओबीसी आरक्षणावरूनही केली सडकून टीका

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी छत्रपती घराण्यातील व्यक्तीला उपोषणाला बसावे लागते, ही असंवेदनशीलता फक्त याच सरकारच्या काळात दिसली. राज्य सरकारने उपोषण मागे घेण्यासाठी संभाजीराजे छत्रपती यांना आश्वासने दिली आहेत. मात्र, ही आश्वासने पूर्ण होतील की नाही, याबाबत साशंकताच आहे. ओबीसी समाजासाठी सुरू करण्यात आलेल्या महाज्योती संस्थेकडून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे पैसे दिले जात नाहीत. महाज्योती बंद पाडण्याचे काम राज्य सरकारकडून सुरू आहे. ओबीसी समाजावर महाविकास आघाडी सरकारचा इतका राग का, असा सवाल या वेळी देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला.

(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ६वर..



# दिव्य गर्भसंस्कार दिव्य भारतमुळे गर्भवतींना फायदे -डॉ. भारती पवार

## पनवेल महापालिका व प्रजापिता ब्रम्हकुमारीतर्फे शिबिर



**पनवेल : प्रतिनिधी**

दिव्य गर्भसंस्कार दिव्य भारत या वर्षभर चालणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये भयमुक्त, सशक्त आणि निरोगी जीवन जगण्यासाठीच्या विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला असून गर्भवती महिला निरोगी, आनंदी राहण्यासाठी या कार्यक्रमाची मदत होणार आहे. या कार्यक्रमामुळे गर्भवती महिला निरोगी बाळांना जन्म देऊ शकतील आणि एका निरोगी जगाचे निर्माण करू शकणार आहेत, असे प्रतिपादन केंद्रिय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी ऑनलाइन पध्दतीने उपस्थित राहून केले.

महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. २) पनवेल महानगरपालिका व प्रजापिता ब्रम्हकुमारी यांच्या संयुक्त विद्यमाने आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके या ठिकाणी दिव्य गर्भसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती हर्षदा उपाध्याय, नगरसेवक, नगरसेविका तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, पनवेल ब्रम्हकुमारीजच्या इनचार्ज ताराबेन, डॉ. ई. व्ही स्वामीनाथन, डॉ. शुभदा नील प्रत्यक्ष उपस्थित होते. तर डॉ. नंदिता पालशेतकर, समाजिक कार्यकर्त्या सुधा कांकरिया अनेक मान्यवर ऑनलाइन पध्दतीने उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, एखादा रोग येऊन गेल्यावर सारा देश त्या आपत्तीने ग्रस्त होतो. अशा परिस्थितीत देशातील व्यवस्था सुधारण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. विविध मार्गांचा अवलंब करून वैद्यकिय व्यवस्था सक्षम करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे.

महापौर डॉ. कविता चौतमोल म्हणाल्या की, महापालिका रस्ते, स्वच्छता, पाणी, प्राथमिक आरोग्य याविषयीची कामे करत असते, परंतु ब्रम्हकुमारीजच्या मदतीने आम्ही गर्भवती महिलांसाठी देखील कार्यक्रम करू शकलो. यापुढेही त्यांनी आपले सहकार्य महापालिकेला केल्यास विविध कार्यक्रम राबविणे शक्य होईल. (पान २ वर..)

## ऑपरेशन गंगा अंतर्गत हजारो भारतीयांना घरी आणले -पंतप्रधान



**सोनभद्र (उत्तर प्रदेश) : वृत्तसंस्था**

ऑपरेशन गंगा अंतर्गत आतापर्यंत हजारो नागरिक आणि विद्यार्थ्यांना घरी आणले आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. ते उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीनिमित्त सोनभद्र येथे आयोजित सभेत बोलत होते.

या वेळी ते म्हणाले, जगात भारताचे सामर्थ्य वाढल्यामुळेच युद्धजन्य युक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीयांना मायदेशात आणण्यासाठी मोठे अभियान राबविले जात आहे. ऑपरेशन गंगा या अभियानाला गती देण्यासाठी चार मंत्र्यांना परदेशात पाठवले असून हवाई दलही अभियानात उतरले आहे. भारत सरकारने युक्रेनमधील भारतीय नागरिकांना परत आणण्यासाठी कोणतीही हयगय केलेली नाही.

ते पुढे म्हणाले की, भारताचे सामर्थ्य वाढल्याने युद्धकाळातही नागरिकांना सुरक्षितपणे आणण्याचे काम यशस्वीपणे पार पाडले जात आहे. आज जगाची स्थिती आपण पाहत आहात. आपल्या विद्यार्थ्यांना लवकरात लवकर आणण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील आहे.

## महाडमध्ये १२ जणांना श्वानदंश

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील दासगाव परिसरात एक पिसाळलेला कुत्रा रस्त्यावरून चालणाऱ्या लोकांवर हल्ला करीत आहे. गेल्या दोन दिवसांत या कुत्र्याने १२ लोकांना चावा घेतला आहे. गेली काही दिवसांपासून दासगाव परिसरात एका कुत्र्याने दहशत माजवली आहे. हा कुत्रा गाव परिसरात समोर येणाऱ्या व्यक्तीवर हल्ला चढवत आहे. गावातील अनेक लोकांनी याला पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र तो हाती लागला नाही. गेल्या दोन दिवसांत सागर सुरेश चव्हाण, अमित गणपत मनवे, रमेश महातो, मिथुन कर्जावकर, यशवंत वांद्रे, अनंत सीताराम वाडकर, समीक्षा चंद्रकांत जाधव, दीपक कृष्णा पवार, बेचन बिचू कर्मा, मुश्ताक अब्दूल कादिर अनवारे, गुलजार बावडेकर, महमद कलाम, सर्व राहणार दासगाव या १२ लोकांना कुत्र्यानी हल्ला करत चावा घेतला आहे. या सर्व लोकांवर दासगाव प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचार करण्यात आले आहेत.

## निवडक

### पुण्यात ड्रेनेज चेंबरमध्ये गुदमरून चार जणांचा मृत्यू

**पुणे :** लोणी काळभोर येथील कदमवाक वस्तीमधील ड्रेनेज लाइनचे काम करत असताना चार कामगारांचा गुदमरून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. सोसायटीच्या ड्रेनेज लाइनचे काम करण्यासाठी तीन कामगार चेंबरच्या आतमध्ये उतरले होते. श्वास गुदमरून त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मदतीसाठी गेलेल्या चौथ्या कामगाराचाही मृत्यू झाला. मृत कामगारांमध्ये सिकंदर पोपट कसबे, पद्माकर मारुती वाघमारे, कृष्णा दत्ता जाधव, रुपेश कांबळे यांचा समावेश आहे.

### मंत्री नवाब मलिक यांना हायकोर्टाचा दिलासा नाहीच

**मुंबई :** डॉन दाऊद इब्राहिमशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीच्या कोठडीत असलेले राज्याचे मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांना मुंबई हायकोर्टाकडून कोणताही तातडीचा दिलासा मिळालेला नाही. मुंबई हायकोर्टाने मलिक यांच्या याचिकेवर आता ७ मार्चला सुनावणी ठेवली आहे.

## उलवे नोडमध्ये हनुमान मंदिर बांधकामाचा शुभारंभ

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड सेक्टर १७ येथे हनुमान मंदिर बांधकामाचे भूमिपूजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. २) करण्यात आले. या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील सोसायटींचे पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, हनुमान मंदिराच्या बांधकामासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दीड लाख रुपयांची देणगी दिली. या वेळी त्यांनी मंदिरासाठी आणखीनही आर्थिक मदत करणार असल्याचे सांगितले. उलवे नोड सेक्टर १७ येथील रामशेठ ठाकूर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स समोर झालेल्या या भूमिपूजन कार्यक्रमाला भाजप उत्तर भारतीय संघ उलवेचे अध्यक्ष अवधेश कुमार महतो, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, भाजप महिला मोर्चा अध्यक्ष उलवे नोड अध्यक्ष योगिता भगत, अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, वसंतशेठ पाटील, जयवंत देशमुख, सुधीर ठाकूर, भाऊ भोईर, सुजाता पाटील, कामिनी कोळी, किशोर पाटील, कमलाकर देशमुख, आशिष घरत, सुहास भगत, मनोज कुमार मौर्य, ॲड. सूनील मौर्य, आशिष मिश्रा, संदीप कुमार, (पान २ वर..)




## ‘मी घरी आले, माझे मित्रही लवकर घरी यावेत’






**पनवेल : नितीन देशमुख**

रशिया-युक्रेनमध्ये युद्ध सुरू असून युक्रेनमध्ये हजारो भारतीय विद्यार्थी अडकले आहेत. भारत सरकार या सर्व विद्यार्थ्यांना सुखरूपपणे मायदेशी परत आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. रायगड जिल्ह्यातील काही विद्यार्थी युक्रेनमध्ये अजूनही युद्धाच्या ठिणग्या सोसत आहेत, तर काही सुखरुपपणे परतले आहेत. असाच युक्रेन ते भारत या प्रवासातील थरारक अनुभव पनवेल तालुक्यातील करंजाडेत राहणारी प्रचिती पवार हिने सांगितला आहे.

पहाटे मोठी बहिण आदितीचा फोन होता. बातम्या बघ युध्द सुरू झाले आहे. लगेचच मी माझ्या खारकिव्हला राहणाऱ्या मैत्रिणीला फोन केला तेव्हा तिने माझ्यासमोर खूप बॉम्ब पडत आहेत मुले सगळीकडे धावत असल्याचे सांगितले. यानंतर मम्मीचा फोन आला तुम्ही कसे ही करून निघा. तेव्हाच कळले मला युद्ध सुरू झाल्याचे, तोपर्यंत माहीतच नव्हते. मी घरी आले आता माझे मित्र पण लवकर घरी यावेत. (पान २ वर..)

**मला खूप भीती वाटत होती की माझी मुलगी कशी परत येईल. मुलगी २७ फेब्रुवारीला घरी आल्यावर मला खूप आनंद झाला. तिला मुंबईला विमानतळावर पाहिल्यावर माझ्या डोळ्यातून अश्रु आले.**

**-देवयानी पवार,** प्रचितीची आई

### रायगडातील सहा विद्यार्थी परतले

**अलिबाग, खोपोली :** युक्रेनमध्ये गेलेल्यापैकी रायगड जिल्ह्यातील आर्यन राजेंद्र पाटील (पेण), अभिषेक अशोक थोरात (खोपोली), पूर्वा पराग पाटील (अलिबाग), सलवा मोहम्मद सलीम धनसे (खोपोली), प्रचिती दीपक पवार (पनवेल), मोहम्मद करीम शेख हे सहा विद्यार्थी सुखरूप घरी पोहचले. (पान २ वर..)

# दोन ट्रक भरून पुरावे गेले कुठे?

## ■ किरीट सोमय्या यांचा संजय राऊत यांना खोचक सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

किरीट सोमय्या यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यावर निशाणा साधत संजय राऊत यांच्याकडे दोन ट्रक भरून असणारे पुरावे गायब कुठे झाले? असा सवाल करित राऊत आपल्यावर बिनबुडाचे आरोप करित असल्याची खोचक टीकाही त्यांनी केली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे त्यांच्या मंत्र्यांवर कोणतेही नियंत्रण नसल्याचा आरोपही या वेळी किरीट सोमय्या यांनी केला.



काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यावर केलेल्या आरोपांमुळे खळबळ उडाली होती. किरीट सोमय्या यांचे पुत्र नील सोमय्या यांच्या अटकपूर्व जामीन अर्जाच्या सुनावणीवेळी मुंबई पोलिसांनी, संजय राऊतांनी पुराव्यादाखल काहीही दिले नसल्याचे न्यायालयात सांगितले. यासंदर्भात माहिती देताना, किरीट सोमय्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांवर खोचक टीका केली आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे त्यांच्या मंत्र्यांवर कोणतेही नियंत्रण नसल्यानेच खासदार संजय राऊत हे दररोज पत्रकार परिषद घेऊन आमच्यावर वेगवेगळे आरोप करित आहेत. मात्र त्यांच्याकडे कोणतेही पुरावे नसल्याने त्यांचे आरोप बिनबुडाचे असल्याचे वारंवार सिद्ध होत आहे, असे किरीट सोमय्या म्हणाले.

### रोज वेगवेगळे आरोप!

संजय राऊतांनी पोलिसांकडे तक्रार केलेली नाही. संजय राऊतांनी केलेल्या आरोपांबाबत एकही अधिकृत पुरावा दिला नसल्याचे मुंबई पोलिसांनी सांगितले आहे. पंतप्रधान कार्यालयात पुरावे दिले, मग मुख्यमंत्र्यांना दिलेले पेपर कुठे गेले? संजय राऊत घाबरले असल्याने रोज वेगवेगळे आरोप करित असल्याचा टोलाही किरीट सोमय्यांनी लगावला आहे.

## विविध कार्यक्रमांची मेजवानी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केदार भगत मित्रपरिवार या संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील २१ महिलांचा सत्कार, हळदी-कुंकू समारंभ आणि चला जिंकूया पैठणी या कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (दि. ६ मार्च) करण्यात आले आहे. व्हि. के. हायस्कूलच्या मागील मैदानावर होणाऱ्या या समारंभास पनवेलमधील सर्व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शकुंतला रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप महाराष्ट्र सदस्य श्रीनंद पटवर्धन, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, तालुका अध्यक्ष महिला मोर्चा रत्नाताई घरत, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका व भाजप पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या वेळी लकी ड्रॉ, तीन पैठणी साड्या आणि ५१ आकर्षक बक्षिसे वितरित करण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी नितेश भगत ९५९४७६८१४३, भावेश शिंदे ८७७९९७७४९१, संकेत दसवते ९९२०५३०१४३, संतोष वर्तळे ९९६७०५२४२४ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन भाजप युवा नेते केदार भगत यांनी केले आहे.

## पनवेलमध्ये धान्य महोत्सव

### ■ ४ ते ६ मार्चपर्यंत तांदूळ थेट शेतकऱ्यांकडून उपलब्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) रायगड व प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा तांदूळ व धान्य महोत्सवाचे आयोजन ४ ते ६ मार्च दरम्यान शहरातील गुजराथी शाळा, डॉ. आंबेडकर रोड येथे करण्यात आले आहे.

या महोत्सवात महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून खरीप हंगामात विविध योजनेअंतर्गत भात पीक प्रात्यक्षिकामधून उत्पादित झालेले लाल, काळा, जांभळा तांदूळ तसेच सुवासिक इंद्रायणी, बारीक जातीच्या वाडा कोलम, शुभांगी वायएसआर इ. तांदळाची थेट शेतकऱ्यांकडून योग्य दरात विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत.

रब्बी हंगामात उत्पादित कडधान्य तसेच भाजीपालाही थेट शेतकऱ्यांकडून विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. रायगड जिल्ह्यातील आदिवासी बांधवांनी उत्पादित केलेले विविध जातींचे तांदूळ, भाजीपाला, कंदमुळे, कडधान्य इत्यादी उत्पादने विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

विविध महिला बचतगटांची उत्पादने व त्यांचे प्रदर्शनही ग्राहकांसाठी या महोत्सवात प्रमुख आकर्षण असणार आहे. या महोत्सवात जास्तीत जास्त शेतकरी उत्पादनांची खरेदी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## हस्ताक्षर स्पर्धेस प्रतिसाद

**मुंबई** : पारिजात संस्थेने मराठी भाषा दिनानिमित्त खुली ऑनलाइन जागतिक मराठी भाषा हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली.

स्पर्धेसाठी एकूण दहा हजार १०८ ऑनलाइन प्रवेशिका आल्या. स्पर्धेचा निकाल अभिनेत्री शुभांगी गोखले, अभिनेता पार्थ घाटगे यांनी जाहीर केला. या दिवशी पारिजात संस्थेने फेसबुकवर एक संवादही घडवून आणला. त्यात डॉ. दीपक पवार, चिन्मयी सुमित, सचिन गोस्वामी, संदीप डांगे, भाऊसाहेब चासकर आणि अधिवक्ता प्रदीप सामंत यांनी परिषदेत सहभाग घेतला.

पान १ वरून

## दिव्य गर्भसंस्कार दिव्य भारतमुळे गर्भवतींना फायदे -डॉ. भारती पवार

पहिल्या सत्रात डॉ. शुभदा नील यांनी गर्भवती महिलांनी राग नियंत्रित करून आनंदी रहाणे गरजेचे असल्याचे सांगितले ज्यामुळे गर्भवती महिला निरोगी, संस्कारीत बाळाला जन्म देऊ शकतील. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या विविध उपायांचे त्यांनी सादरीकरण केले. यामध्ये विविध प्रकारचा व्यायाम, प्राणायाम, आहार याविषयीची माहिती दिली तसेच उपस्थितांकडून व्यायामाचे प्रकार करवून घेतले. दुसऱ्या सत्रात डॉ. ई. व्ही स्वामीनाथन यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून आपल्या मुलांना संस्कारित बनविण्यासाठी आई-वडिल आणि पुर्व प्राथमिक शाळेची शिक्षिका महत्वाची असल्याचे सांगितले.

डॉ. नंदिता पालशेतकर यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी महापालिका नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्यावतीने उपस्थित महिलांचे हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमास महापालिकेचे वैद्यकिय अधिकारी, अधिकारी, कर्मचारी, गर्भवती महिला, आशा वर्करस्, ब्रम्हकुमारिजचे सदस्य महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

## उलवे नोडमध्ये हनुमान मंदिर बांधकामाचा शुभारंभ



डेविस सर, सुभाष पांडे, अभिषेक भट्टाचार्य, प्रशांत शिवलकर, जवाहरलाल चव्हाण, सागरकुमार रंधवे, अविनाश कजबजे, आदर्श तिवारी आदी उपस्थित होते.

यासोबतच ग्रीन व्ह्यूव, मोहन रेसिडेन्सी, ड्रीम हेरिटेज, नीलकंठ प्राईड, तेजस हाइट्स, साई सागर गॅलक्सी, गुरू आत्मन, आदिनाथ हेरिटेज, साई ऑर्चिड, सिग्नेचर इलाईट, टुडे इम्पेरिया, आर.एस.एम. डायमंड या सोसायट्यांचे पदाधिकारी व रहिवासी उपस्थित होते.

## 'मी घरी आले माझे मित्रही लवकर घरी यावेत'

त्यांना आपल्या सरकारने लवकरात लवकर बाहेर काढावे युक्रेनमधील इव्हानो फ्रांसक्कीसमध्ये मेडिकलच्या दुसऱ्या वर्षाला शिकणारी पनवेलच्या करंजाडे येथील प्रचिती दीपक पवार सांगत होती.

युक्रेनमध्ये मी पश्चिम बाजूला असल्याने आम्हाला वाटलेले युध्द झाले तरी आमच्याकडे फारसे काही होणार नाही. २४ तारखेला आम्हाला समजले की खारकीव्ह आणि त्यांची राजधानी किव्हमध्ये युध्द सुरू झाले असून आमच्या इथले विमानतळही उडवण्यात आले आहे. २५ तारखेला आम्हाला तेथून निघावे लागेल, असे सांगण्यात आले पण काही झाले नाही. मेयरने आम्हाला सगळे लाईट बंद करा बाहेर पडू नका सांगितले होते. प्रत्येक कॉलनीच्या बाहेर रुग्णवाहिका उभी होती. कारण कोठेही बॉम्ब पडण्याची शक्यता होती. आता घरी कसे जाणार, कधी जाता येईल असा प्रश्न निर्माण झाला होता. कारण प्रथम हॉस्टेलमधील मुलांना नेले जाईल मग आमचा नंबर कधी लागेल असा प्रश्न पडला होता.

तिथे आपल्या देशातील २० हजार मुले आहेत. त्यातच विमानाच्या तिकिटाचे दर खूप वाढले होते. कमीत कमी दर एक लाख १५ हजार होता. तो सर्वांना परवडणारा नव्हता. बहुतेकांची तिकिटे १ मार्च पासूनची होती माझे २ मार्चचे होते, पण त्यापूर्वीच युध्द सुरू झाले.

आम्ही विद्यार्थ्यांचा २५ तारखेला ग्रुप बनवून बस केली. रुमानियाला आम्ही ५० मुले रात्री निघालो ते खूप रिस्की होते कारण तिथून रात्री फ्लाईट नव्हते कधी ही कोणी आम्हाला थांबवू शकत होते, पण असे काही घडले नाही. बसवर आम्हाला सांगण्यात आले होते भारताचा ध्वज लावा त्याप्रमाणे आम्ही लावला होता. त्यामुळे कोणती अडचण आली नाही. चेक पोस्टवर सोडून देण्यात येत होते. काही विचारत नव्हते. बॉर्डरपासून ५-६ किमी अंतरावर आम्हाला बस थांबवावी लागली, कारण पुढे मोठी रांग होती. त्यानंतर आम्हाला चालत प्रवास करावा लागला जवळजवळ १५-२० किमी प्रवास चालत केला. रुमानियाच्या बॉर्डरवर गेलो. तिथे आधीच खूप मुले आली होती, गर्दी होती, १५-२० मिनिटे गेटच्या बाहेर थांबल्यावर आम्हाला जायला दिले. इमिग्रेशनसाठी ८ ते ९ तास आम्ही रांगेत उभे होतो. रुमानियाच्या सरकारने, एनजीओ आणि आपल्या वकिलातीने आम्हाला विमानतळापर्यंत पोहचायला खूप मदत केली. रुमानियाच्या बॉर्डरवर युक्रेनची लोक आणि परदेशी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात जमले होते. युक्रेनची लोक आम्हाला पुढे जाऊन देत नव्हती त्यांना मारून ढकलून पुढे जावे लागत होते. परदेशी मुले एकमेकांना मदत करीत होते.

युक्रेनच्या बॉर्डर बाहेर पाच हजार मुले ३४ तास थंडीत उणे २ डिग्री तापमानात उभी होती. माझ्या काही मैत्रिणींचे पेपर फेकून दिले त्यांना मारले. आत जाऊन देत नव्हते. कालपासून त्यांना थोडी फार एंट्री दिली जात आहे. किव्हमधल्या मुलांना काढले पण सुमीसिटीमध्ये बॉम्ब हल्ले होत असल्याचा माझ्या मैत्रिणीचा फोन होता, पण त्या मुलांना अजून काहीच मदत नाही. खारकीव्हची अर्धी मुले अडकली आहेत. तीन दिवसांपासून ती मेट्रो किंवा बंकरमध्ये आहेत. खायला आणायला बाहेर पडले की, बॉम्ब हल्ला सुरू होतो, मग धावत पुन्हा बंकरमध्ये यावे लागते.

युध्द सुरू झाल्याचे समजल्यापासून घराचे सगळे काळजीत होते. मी बॉर्डर क्रॉस केल्यावर आईला सांगितले आम्ही सुरक्षित आहोत तरी आईच्या मनात धाकधुकी होती मी कधी येणार काय चालले आहे? काय होणार? अखेर मी घरी आले म्हणून चांगले वाटले. मी नि:श्वास सोडला कारण मी घरी आल्यावर तेथील परिस्थिती खूप बिघडली आहे, पण आता मला वाटते माझे मित्र पण लवकर घरी यावेत. त्यांना आपल्या सरकारने लवकरात लवकर आणावे.

## रायगडातील सहा विद्यार्थी परतले

रायगड जिल्ह्यातील ३२ विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी युक्रेनमध्ये गेले आहेत. रशियाने युक्रेनवर केलेल्या आक्रमणामुळे निर्माण झालेल्या युध्द परिस्थितीमध्ये हे विद्यार्थी युक्रेनमध्ये अडकून पडले आहेत. त्यांना सुखरूप मायदेशी आणण्यासाठी रायगड जिल्हा प्रशासन प्रयत्न करत आहे.

रायगड जिल्हा प्रशासन युक्रेनमध्ये अडकलेल्या रायगड जिल्ह्यातील विद्यर्थ्यांच्या पालकांशी संपर्क ठेवून आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांचा एक व्हॉटसअॅप ग्रुप तयार केला आहे. त्या माध्यमातून माहिती घेतली जात आहे. ही माहिती राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला दिली जात आहे. ती भारत सरकारकडे माहिती पाठवत आहे. विद्यार्थ्यांना आपल्या देशात परत आणण्यासाठी भारत सरकार प्रयत्न करत आहे.

युद्ध सुरू असल्यामुळे विद्यार्थ्यांना युक्रेनच्या सीमेपर्यंत पोहचणे कठीण बनले आहे. काही विद्यार्थी ५० किलोमीटरचा पायी प्रवास करून शेजारच्या रोमानिया देशात पोहचले आहेत. जे विद्यार्थी रोमानियात पोहचले आहेत त्यांना लवकरच भारतात आणले जाईल, असे रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी सांगितले.

खोपालीतील सलवा ही विद्यार्थिनी मंगळवारी सुखरूप घरी पोहचली. युक्रेनमधील परिस्थिती भयानक असून चौदा ते पंधरा किलोमीटर पायपीट करत तीस किलो सामानासाठी विमानतळ गाठावे लागल्याचे सलवा हिने सांगितले. केंद्र शासनाने वेळीच खबरदारी घेऊन विद्यार्थ्यांना भारतात आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल विद्यार्थ्यांच्या पालकांकडून मोदी सरकारचे आभार मानण्यात येत आहे. आपले पाल्य सुखरूप आल्याबद्दल कुटुंबामध्ये आनंदाचे वातावरण आहे.



**पनवेल : नवीन पनवेल येथील आयुष्मान हॉस्पिटलजवळ कुसूम सचदेव आणि मेहक जेसवानी यांनी नव्याने कुसूम ट्रॅव्हल्स सुरू केले आहे. या ट्रॅव्हल्सच्या कार्यालयाचे मंगळवारी उद्घाटन झाले. प्रसंगी महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील उपस्थित होते.**



**पनवेल : भारतीय जनता पक्ष खांदा कॉलनी आणि ओमसाई खांदेश्वर महिला व बाल मित्रमंडळाच्या वतीने खांदा कॉलनीत खांदेश्वर कोकण महोत्सव उपमहापौर सीताताई पाटील यांनी आयोजित केला होता. महोत्सवाचे ११ वे वर्ष होते. या महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी प्रेक्षकांना मिळाली. महोत्सवाचा समारोप मंगळवारी झाला.**

## रसायनीतील माजी विद्यार्थी २६ वर्षांनंतर एकत्र



**मोहोपाडा :** रसायनी येथील एचओसी स्कूलमधील १९९५-९६ या दहावीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा २६ वर्षांनंतर मोठ्या उत्साहात पार पडला. आपल्या वर्गमित्रांना एकत्रित आणण्याचे काम देवळोली येथील माजी सरपंच जयदास पाटील, प्रविण पवार, दत्ता देसाई, भिम जाधव यांनी केले. या वेळी जमलेल्या विद्यार्थ्यांनी आपली माहिती एकमेकांना सांगितली. यानंतर भोजनाचा कार्यक्रम होऊन प्रत्येकाला भेटवस्तू देऊन एकमेकांच्या सुख-दुःखात सामील व्हायचे असे ठरले.

## लिमये वाचनालयात मराठी भाषा दिन उत्साहात



**पनवेल** : के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालयात मराठी भाषा दिन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या वेळी योगेंद्र ठाकूर यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी मराठी भाषा बोलताना न्यूनगंड न बाळगता, आपण अभिमानाने या भाषेचा वापर केला पाहिजे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला संस्थेचे कार्यवाह काशिनाथ जाधव, हेमालिनी कुलकर्णी, कार्यकारी सदस्य अॅड. माधुरी थळकर, ज्येष्ठ वाचक दत्तात्रेय जाधव, रमेश चव्हाण, सुभाष मेहेतर, चंद्रकांत कुरघोडे यांच्यासह वाचक उपस्थित होते.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
गुरुवार, दि. ३ मार्च २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर

कोव्हॅक्सिन

- १. काळभैरव कार्यालय, कळंबोली (१५ ते १८+)
- २. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५ ते १८+)
- ३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५ ते १८)
- ४. प्राथमिक आरोग्य केंद्र, खारघर (१५ ते १८)

Pricautionary हे फक्त दुसरा डोस घेऊन ९ महिने पूर्ण झालेल्या HCF, FLW व ६० वर्षावरील Comorbid व्यक्तींचेच लसीकरण केले जाईल, याची नोंद घ्यावी.

## निवडक



### विज्ञान दिन उत्साहात साजरा

**पनवेल** : कोएसोच्या के. वी. कन्या विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांत शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. या वेळी विद्यार्थिनींनी वेगवेगळे प्रयोग तयार केले होते. तसेच विज्ञानावर आधारित कविताही सादर केल्या. दरम्यान, अंधश्रद्धा दूर करणारे नाटक विद्यार्थिनींनी सादर केले.

### उड्डाणपुलाखाली आढळला मृतदेह

**पनवेल** : पनवेलजवळील पळस्पे येथील उड्डाणपुलाखाली महाऑटो शोरुमच्या समोर असलेल्या फुटपाथवर एका व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. त्याच्या नातेवाइकांचा शोध पनवेल शहर पोलीस करित आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ३५ ते ४० वर्षे, वर्ण सावळा, अंगात पांढऱ्या रंगाचा रेषा असलेल्या शर्ट व काळ्या रंगाची हाफ पॅन्ट परिधान केली आहे तसेच त्या ठिकाणी अपंग व्यक्ती वापरतात ती सायकल आढळली आहे. या व्यक्तीबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### कळंबोलीतून वृद्ध व्यक्ती बेपत्ता

**पनवेल** : कळंबोली येथील राहत्या घरातून ७३ वर्षीय वृद्ध व्यक्ती बेपत्ता झाल्याने ते हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रामाधार चुलहाई सिंग (७३ रा. सेक्टर १७, रोडपाली) उंची ५ फूट ३ इंच, रंग गहुवर्णीय, डोक्याच्या समोरील बाजूस टक्कल असून उजव्या बाजूस वाकून चालतात. अंगामध्ये पांढऱ्या रंगाचे हाफ शर्ट आणि काळ्या रंगाची साधी पॅन्ट घातलेली आहे. त्यांना हिंदी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### चाईल्ड केअरतर्फे धान्यवाटप

**उरण** : मराठी भाषा दिनानिमित्त चाईल्ड केअर सामाजिक संस्था, उरणतर्फे नवघर, पागोटे झोपडपट्टी येथे धान्यवाटप करण्यात आले. या वेळी नवघर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जयप्रकाश पाटील, जाणता राजा प्रतिष्ठान पागोटेचे अध्यक्ष विवेक पाटील तसेच चाईल्ड केअर संस्थेचे संस्थापक विकास कडू, कार्याध्यक्ष विक्रांत कडू, उपाध्यक्ष मनोज ठाकूर, रोशन धुमाळ, सदस्य विपुल कडू हे उपस्थित होते.

# रक्तदान हेच श्रेष्ठदान!

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाने जपली सामाजिक बांधिलकी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि सार्वजनिक रूग्णालय वाशी, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार ( दि. २ मार्च) रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. संजय मराठे यांच्या हस्ते झाले. रक्तदान हेच श्रेष्ठदान असल्याने जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करण्याचे आवाहन या शिबिरात त्यांनी केले.




विज्ञानाच्या धावत्या युगामध्ये तंत्रज्ञानाची जितकी गरज आहे तितकीच सुदृढ आरोग्याचीही गरज आहे. आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी रक्तदान अत्यावश्यक आहे. म्हणून समाजाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. कोरोना काळात रक्ताची कमतरता भासल्याने अनेकांना जीव गमवावा लागला होता. त्याचप्रमाणे दिवसेंदिवस वाढत असलेल्या अपघातात जखमी झालेल्यांना, गर्भवती महिलांनाही रक्ताची आवश्यकता भासत असते. त्यामुळे या शिबिरातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करित असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या वेळी राष्ट्रीय सेवासंघाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रवीण सावे, प्रा. रोहित पाटील, प्रा. मानसी शहा आणि प्रा. भरत सोनांकी आदी उपस्थित होते. महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.

## 'अंनिस'ने साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अंनिसचे सदस्य अजय निकम यांनी नवी मुंबई महानगर पालिका शाळा क्रमांक १५ येथील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कोणतीही गोष्ट करताना त्याची विज्ञानवादी दृष्टिकोनातून सत्यता पडताळून पाहण्याचे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनीही या वेळी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

काही बुवा, बाबा आपल्या अज्ञानाचा फायदा घेतात, जादूटोणा, अघोरी, अनिष्ट प्रथा, भानामतीच्या माध्यमातून गरीब जनतेचे शोषण करतात. यामुळे आपण आता सावध होण्याची गरज असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले. त्याचप्रमाणे पाण्याने दिवे पेटविणे, नारळातून हळद- कुंकू, कपडे, बांगड्या काढणे, माचिसशिवाय मंत्राने अग्नी पेटवणे, एक वस्तू गायब करुन तिच्या ऐवजी दुसरी वस्तू काढून दाखविणे असे अनेक प्रयोग व त्यामागील वैज्ञानिक सत्यता याची प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांना माहिती दिली. तर शिरवणे शाळेच्या मुख्याध्यापिका तन्वी सुर्वे यांनी विद्यार्थ्यांना, कोणत्याही गोष्टीकडे डोळसपणे पाहण्याचे आवाहन केले.

# रामशेठ ठाकूर विद्यालयात मराठी दिनासह विज्ञान दिन उत्साहात



**खारघर** : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय आणि न्यू इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



या दिवशी विद्यार्थ्यांनी एकपात्री नाटक स्पर्धेत सहभाग घेतला. कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या प्राचार्या दुर्गा व पर्यवेक्षिका वीणा यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. गडदे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय आणि न्यू इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच विज्ञान दिनाचे औचित्य साधून विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन ज. भ. शि. प्र. संस्थेचे सचिव डॉ. गडदे यांनी केले.

यात प्रामुख्याने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित, संगणक, भूगोल इ. विषयांना अनुसरून विविध प्रकल्प बनविले होते. यात दोन्ही शाखेच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विज्ञान दिनाचे औचित्य साधून रांगोळी स्पर्धा आणि विज्ञान प्रश्नमंजुषेचे आयोजनही करण्यात आले होते. या सर्व उपक्रमांसाठी विद्यालयाच्या प्राचार्या दुर्गा व पर्यवेक्षिका वीणा यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. गडदे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.





# हळदी-कुंकू कार्यक्रमांतून संस्कृतीचे जतन

## महापौर डॉ. कविता चौतमोल यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका प्रभाग क्रमांक ५ चे नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांच्या माध्यमातून प्रभागातील सेक्टर ५ मधील अधिराज गार्डन येथे हळदी-कुंकू कार्यक्रम पार पडला. या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी, हळदी-कुंकू कार्यक्रमातून हिंदू संस्कृतीचे जतन केले जात असल्याचे प्रतिपादन केले.

पारंपरिक सणाला वाण देण्यासोबत आधुनिकतेची जोड देण्यात आली. या वेळी मेहंदी, टॅटू, हेअर मेकअप, पेस्ट्रिज मेकिंग, क्राफ्ट मेकिंग, वारली पेंटिंग बॅग्ज, ज्वेलरी अ‍ॅण्ड सिल्वर थ्रेड, हॅण्डलूम्स साडी, हॅण्डमेड ज्वेलरी याचे प्रदर्शन लावण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी दीपप्रज्वलन करून केली. पाहुण्यांचे स्वागत समारंभाला अधिराज गार्डन सोसायटीतील मुलींनी नृत्य सादर केले. प्रमुख पाहुण्या महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांच्या कार्याचे कौतुक केले. याशिवाय पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने स्त्री सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्या योजनांची माहिती त्यांनी दिली.




हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शोभा मिश्रा, भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा सरचिटणीस साधना पवार, उपाध्यक्षा प्रतीक्षा कदम व संजना काकडे यांनी विशेष मेहनत घेतली. याप्रसंगी महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, अ- प्रभाग समिती सभापती संजना कदम, मंडळ अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्षा संध्या शारबिद्रे, सोशल मिडिया जिल्हा सहसंयोजिका मोना अडवाणी, समीर कदम, मंडळ उपाध्यक्षा बीना गोगरी, सोशल मिडिया संयोजक अजय माळी, उद्योग आघाडी उपाध्यक्ष प्रशांत दुडम, सुशीला शर्मा, निर्मला राव, वैद्यकीय विद्यार्थी आघाडीचे विजय उजलंबे उपस्थित होते.

## कामोठेमध्ये छोट्या वैज्ञानिकांचे प्रदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

कामोठेच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये छोट्या वैज्ञानिकांसाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. पाणी नियोजन, वीज निर्मिती यांसह विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प सादर केले होते. सेवा सहयोग यांच्या माध्यातून आयोजन करण्यात आले होते.

सेवा सहयोग फाऊंडेशन संस्थेद्वारे फिरती विज्ञान प्रयोगशाळा चालवण्यात येत आहे. या नॅनो रॉकेट गाड्या विविध भागांत फिरतात. ही फिरती प्रयोगशाळा शिक्षकांसह अशा सर्व शाळांत आणि वस्तीमध्ये जाते जिथे सुसज्ज प्रयोगशाळा नाहीत. अशा शाळांमध्ये जाऊन अभ्यासक्रमातील विविध प्रयोग मुलांना करून दाखवतात. या वर्षीही सेवा सहयोग फाऊंडेशनने विज्ञान दिनाचे औचित्य साधून छोटे शास्त्रज्ञ ही नाविन्यपूर्ण कल्पना घेऊन हा दिवस साजरा केला. विद्यार्थ्यांना रॉकेट मेकिंग, आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा व खेळ आयोजित केले होते. त्या स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षीस देण्यात आली. या प्रदर्शनात पनवेल, नवी मुंबई, घाटकोपर, विरार, भाईंदरमधील ९४ शाळाच्या अभ्यासिकेचे २३९ शिक्षक व एक हजार १३४ विद्यार्थी सहभागी झाले होते.

## मराठी न्यायशब्दकोश समृद्ध होणे गरजेचे -डॉ. अस्मिता वैद्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयात नुकतेच जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त मराठी वाङ्मय मंडळातर्फे ऑनलाइन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमास शासकीय विधी महाविद्यालय मुंबईच्या प्राचार्या डॉ. अस्मिता वैद्य प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शितला गावंड यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी त्यांनी, मराठी न्यायशब्दकोश समृद्ध होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

तसेच कार्यक्रमात मराठी भाषा-न्यायव्यवस्थेतील उपयोगिता आणि आव्हाने या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. जोपर्यंत मराठी न्यायशब्दकोश समृद्ध होत नाही, तोपर्यंत अभ्यासक्रमात आणि न्यायालयात इंग्रजी शब्दांचा वापर होतच राहणार, असेही त्यांनी नमूद केले. चांगली वकिली करण्याकरिता उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय नियमितपणे वाचणे अत्यंत गरजेचे असल्याचेही सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा. प्रा. संघप्रिया शेरे यांनी केले आणि आभार प्रदर्शन सहा. प्रा. भाग्यश्री पाटील यांनी केले. कार्यक्रमात समृद्धी तिवाटणे आणि फैझान शेख या विद्यार्थ्यांनी तांत्रिक बाबी सांभाळल्या. या कार्यक्रमाची सुरुवात 'लाभले आम्हास भाग्य' या मराठी अभिमान गीताने तर सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## महाशिवरात्रीनिमित्त आर्या वनौषधी संस्थेतर्फे बिल्व दिन



**पनवेल : वार्ताहर**

महाशिवरात्रीचे औचित्य साधून पनवेल येथील आर्या वनौषधी संस्थेच्या वतीने बिल्व दिन साजरा करण्यात आला.

या वेळी पेण, पनवेल, गोंदिया, रत्नागिरी, बोईसर, डहाणू, अलिबाग, उरण येथे बेलाची रोपे वाटप व लागवड करण्यात आली. सदर कार्यक्रमात बेलाच्या औषधी गुणधर्मांची माहिती असलेली पत्रकेही वाटण्यात आली. आर्या वनौषधीच्या या आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमात वनौषधी तज्ज्ञ सुधीर लिमये, आयुर्वेदाचे अभ्यासक नरेंद्र लिमये, पत्रकार दत्तू कोल्हे, आर्या वनौषधी संस्थेचे सुधीर पाटील, विनोदकुमार जांभूळकर आदींचा सहभाग होता.

बिल्व दिनानिमित्ताने या वेळी महाशिवरात्र व आयुर्वेद हा विशेष कार्यक्रमही घेण्यात आला.

महाशिवरात्रीला भगवान शंकराला वाहणाऱ्या बिल्वदल, कवठ, बिल्व फळ, धोत्रा फूल, धोत्रा फळ, आंबा मोहोर, पळस फुले आदी पत्री वाहिली जाते. या पाना-फुलांच्या औषधी गुणधर्मांची माहिती या वेळी आर्या वनौषधी संस्थेचे सुधीर पाटील यांनी दिली.

बेलामध्ये असलेले अनेक गुण पाहून त्याचा समावेश ऋषिमुनींनी ईश्वर पुजेकरिता केला. देवाला वाहण्याच्या निमित्ताने या वनस्पती सहज हाताळल्या जाऊन त्यांच्या गुण वैशिष्ट्यांची, उपयोगाची माहिती मिळावी, हाच उद्देश त्यामागचा असावा, असेही सुधीर पाटील यांनी या वेळी सांगितले.

## विविध मागण्यांसाठी भाजपचे नवी मुंबई आयुक्तांना निवेदन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपा सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी संबंधित संस्थांकडून वारंवार अनामत रक्कम घेत असते, ती वारंवार घेऊ नये. केवळ भाडे आकारावे यांसह बेरोजगार अभियंत्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत भाजपचे माजी नगरसेवक भरत जाधव यांनी मनपा आयुक्त अभिजित बांगर यांना निवेदन दिले. यावर बांगर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

नवी मुंबईतील बेरोजगार अभियंत्यांना काम मिळावे, मनपा कर्मचारी बदली धोरणाची अंमलबजावणी व्हावी आदी मागण्यांसाठी भरत जाधव यांनी मनपाच्या आयुक्तांची भेट घेतली. यावेळी सुमारे २० बेरोजगार अभियंते उपस्थित होते. या बेरोजगार अभियंत्यांना छोटी-मोठी कामे देऊन त्यांच्या हाताला रोजगार द्यावा, याबाबत निवेदन देण्यात आले. बेरोजगार अभियंत्यांनी आपली नोंदणी शासन दरबारी करून त्या बेरोजगार अभियंत्यांना रोजगार देण्याबाबत आश्वासन दिले.

त्याचप्रमाणे सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मैदानाच्या वापरासाठी संबंधित संस्थांकडून पालिका वारंवार अनामत रक्कम घेते. त्यांच्याकडून केवळ भाडे घ्यावे, अशी मागणीही करण्यात आली. याविषयी आयुक्तांनी लवकरच कारवाई करणार असल्याचे सांगितले.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १०

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती नवीकंपनी ३१ मार्चलाज्युनिअर निफ्टी५० मध्ये समाविष्ट होणार आहे?**
***अ.)*** नायका ***ब.)*** वेदान्त फॅशन ***क.)*** मेगास्टार फुड्स ***ड.)*** अदानी विल्मर

**२. एलआयसी ऑफ इंडियाच्यासध्या अंदाजे किती शाखा आहेत?**
***अ.)*** एक लाखापेक्षा अधिक ***ब.)*** ११ हजारांपेक्षा अधिक ***क.)*** ५० हजार ***ड.)*** २५ हजार

**३. तरुणपणी उत्पन्न सुरु होताच तुम्ही कोणत्या गुंतवणुकीला महत्व द्याल?**
***अ.)*** शेअर बाजार ***ब.)*** जीवन विमा योजना ***क.)*** एनपीएस ***ड.)*** कुटुंबाचाआरोग्य विमा

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# आघाडीची अग्निपरीक्षा

मागील दाराने राज्यात सत्तेवर आल्यापासून महाविकास आघाडी सरकारने आजवर विधिमंडळाचे एकही अधिवेशन धडपणाने होऊ दिलेले नाही. दरखेपेला कोरोना महामारीचे कारण पुढे करीत कमीत कमी दिवसांत अधिवेशन गुंडाळण्याचा पळपुटेपणाच सत्ताधारी करीत आले आहेत. गुरूवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मात्र सत्ताधाऱ्यांना कोरोनाच्या नावाखाली पळ काढता येणार नाही. त्यामुळेच या अधिवेशनात सत्ताधारी विरुद्ध विरोधीपक्ष संघर्ष टिपेला जाईल, अशी शक्यता वर्तवली जाते आहे.

**गेल्या काही महिन्यांपासून प्राप्तिकर, सक्तवसुली संचालनालय (ईडी) आणि अन्य केंद्रीय यंत्रणांकडून राज्यातील सत्ताधारी आघाडीतील काही मंत्र्यांची व वाचाळ नेत्यांची चौकशी सुरू आहे. या कारवाईच्या संदर्भात सत्ताधाऱ्यांनी भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनाच अकारण लक्ष्य करण्यास सुरूवात केली असून विशेषत: विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, किरीट सोमय्या यांच्यावर त्यांचा रोख अधिक राहिला आहे. त्यातच मुंबई बॉम्बस्फोटांशी संबंधित असलेल्या, गुन्हेगारी जगताशी संबंधित व्यक्तीकडून जमीनखरेदी केल्याच्या आरोपावरून अलीकडेच ईडीने अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांना अटक केली. या प्रकरणाचा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंध असूनही आघाडीचे घटक पक्ष मलिक यांना पाठिशी घालताना दिसतात. कुख्यात दाऊद इब्राहिमच्या नातेवाईकांबरोबर केलेल्या आर्थिक व्यवहाराचे समर्थन कसे काय केले जाऊ शकते? अर्थातच भाजपने मलिक यांच्यावरील ईडीची कारवाई योग्यच असल्याची भूमिका घेत मलिक यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. मलिक यांनी राजीनामा दिल्याखेरीज अधिवेशन चालू देणार नाही, असा इशाराच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी दिला आहे. भाजपच्या या आक्रमक भूमिकेमुळे अधिवेशनाच्या सुरूवातीपासूनच सत्ताधारी आणि विरोधीपक्ष यांच्यात संघर्षाची ठिणगी पडेल यात शंका नाही. मविआच्या नेत्यांनी केंद्रीय यंत्रणांच्या गैरवापराचा तसेच मलिक यांच्यावर सूडबुद्धीने कारवाई करण्यात आल्याचा कांगावा सुरू ठेवला आहे, परंतु मलिक यांना पाठिंबा देणे म्हणजे मुंबई बॉम्बस्फोटांत निरपराधांचे बळी घेणाऱ्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी दाऊद इब्राहिमला साथ देणे आहे, हे वास्तव जनतेपर्यंत पोहचवल्याशिवाय भाजपही स्वस्थ बसणार नाही. आजवर दाऊदच्या विरोधात आक्रमक भूमिका घेणारी शिवसेना आताच असा बोटचेपेपणा नेमका कशामुळे करते आहे या प्रश्नाचे उत्तर त्यांना द्यावेच लागेल. भाजपच्या या आक्रमक चढाईला प्रत्युत्तर म्हणून सत्ताधारी आघाडीने त्यांच्या नेत्यांचे गैरव्यवहार चव्हाट्यावर आणणारे भाजप नेते किरीट सोमय्या यांना लक्ष्य केले आहे. यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नाही, मात्र त्यांच्या मुलालाही अकारण यात गोवण्याचा प्रयत्नही सत्ताधाऱ्यांनी चालवला आहे. राज्यपाल पद हे तर राज्यातील सर्वोच्च मानाचे स्थान, परंतु कट–कारस्थानातून सत्तेवर आलेल्या महाविकास आघाडीने राज्यपालांचा मानही कधीच ठेवलेला नाही. याखेपेसही ते राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळी पुन्हा जुनाच राज्यपालनियुक्त आमदारांचा प्रश्न काढून तसेच नकोती वादग्रस्त विधाने त्यांच्या तोंडी घालून आकांडतांडव करतील हेही अपेक्षितच आहे. भारतीय जनता पक्ष मात्र जनतेच्या प्रश्नांवरून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरणार आहे. शेतकरी कर्जमाफी योजनेच्या लाभापासून आजही हजारो शेतकरी वंचित आहेत. शेतकऱ्यांची वीज जोडणी तोडण्याचा प्रश्न असो वा ऊसाच्या गाळपाचा सरकारला जाब विचारला जाणारच असे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितले आहे. फडणवीसांची तोफ पुन्हा धडाडू लागणार या कल्पनेनेच सत्ताधाऱ्यांची झोप उडाली असेल हे निश्चित.**

# पोलादपुरातील पाणी योजना दुरूस्तीच्या प्रतीक्षेत


**खबरबात**
**शैलेश पालकर**

अतिवृष्टीमुळे २२ जुलै २०२१ रोजी पोलादपूर तालुक्यातील पाच प्रमुख नद्यांसह अनेक उपनद्यांची पात्रं दुथडी भरून वाहू लागल्याने नदीपात्रातील विविध गावांच्या पाणीपुरवठा योजनांच्या जॅकवेल वाहून गेल्या. त्यापैकी पोलादपूर नगरपंचायत हद्दीतील एकमेव जुनी पाणीपुरवठा योजना वेळेवर निधी मिळूनही सुरू झाली नसल्याचे दिसून येत आहे.

राजकीय ठेकदारी आणि टक्केवारीच्या व्यवस्थेमुळे पोलादपूर तालुक्यातील नळपाणी योजनांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून 'पाणी मुरतंय', अशी परिस्थिती झाली आहे. उन्हाळ्यात पाणीटंचाई भीषण रूप धारण करीत असताना अनेक योजनांची अवस्था खडखडाट अशीच आहे. जिल्हा परिषदेच्या पोलादपूर येथील बांधकाम विभागामध्ये काही काळ सुरू झालेले ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यालय पुन्हा महाड पंचायत समितीच्या आवारात नेण्यात आले आहे. त्यामुळे पोलादपूर तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांबाबतच्या सरकारी अनास्थेमध्ये वाढ होऊन पाणीटंचाई निवारणाच्या कायमस्वरूपी प्रयत्नांना खीळ बसली आहे. दुसरीकडे अभियंत्यांच्या मते योजनांचा दरडोई खर्च मर्यादित असताना प्रत्यक्षात पाण्याचा उद्भव आणि योजनेतील अंतरामुळे दरडोई खर्च वाढत असल्याने मंजुरीस अडथळा येत आहे.

पोलादपूर तालुक्यातील वाकण, नाणेघोळ, पितळवाडी, गोळेगणी, बोरघर, वडघर, कामथे, कुडपण बुद्रुक, कुडपण बुद्रुक मधलीवाडी, देवपूर, खडपी, गांजवणे, माटवण, कापडे बुद्रुक, बोरावळे, घागरकोंड, चाळीचा कोंड, महाळुंगे, लहुळसे, तुटवली, परसुले, पार्ले, वझरवाडी, ओंबळी, पैठण–पांगळोली, कोतवाल बुद्रुक, बोरघर उमरठ, काटेतळी, तुर्भे बुद्रुक, सडवली, चोळई, पळचिल, कोतवाल बुद्रुक, साखर खडकवाडी, आडावळे बुद्रुक, कोंढवी, धामणदिवी, भोगाव बुद्रुक, देवळे, करंजे, गोवेले, सडेकोंड, चांभारगणी बुद्रुक, गोवेले साळवेकोंड, गोवेले, सावंतकोंड–पार्टे कोंड, चरई, तुर्भे खुर्द, चांभारगणी बुद्रुक, आंग्रेकोंड, रानबाजिरे, तामसडे–मोरेवाडी, आडावळे, दिवील, मोरसडे, लोहारे, मोरगिरी, मोरगिरी फौजदारवाडी, कोतवाल खुर्द, कोतवाल खुर्द रेवाडी, ढवळे, खांडज, खोपड, केवनाळे, महालगूर, आडाचीवाडी, तुर्भेखोंडा व तुर्भेबुद्रुक अशा जुन्या नळपाणी योजना आहेत तर रानवडी, गुडेकरकोंड, कुडपणखुर्द, कातळी, भोगाव खुर्द, क्षेत्रपाळ, धारवली, निवे, दाभिळ, किनेश्वर अशा नवीन नळपाणी पुरवठा योजना मंजूर झाल्या असून प्रगतीपथावरील या योजना गेल्या काही वर्षांपासून कार्यान्वित होता होता २२ जुलै २०२१च्या महापुरात वाहून गेल्या आहेत.

पोलादपूर शहरासाठी नवीन विस्तारित नळपाणी योजना ही प्रत्यक्षात दुरूस्तीअंतर्गत असून यासाठी ९.५ कि.मी. लांबीची पाईपलाईन आवश्यकता होती.त्यात ३.५ कि.मी. लांबीची जुनी आणि सहा कि.मी. नवीन पाईपलाईन वापरली जाणार होती. मात्र जलशुध्दीकरण प्रकल्पाअभावी २००९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भूमिपूजन झालेल्या या पोलादपूर नवीन विस्तारित नळपाणी योजनेचे काम अद्याप रखडलेलेच आहे. जुन्या नळपाणी योजनेच्या माध्यमातून व्यवस्थित पाणीपुरवठा होत असताना २२ जुलै २०२१ रोजी या योजनेची जॅकवेल वाहून गेली. या पाणीपुरवठा योजनेच्या दुरुस्तीसाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून तातडीने एक कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला. मात्र त्याचे श्रेय घेण्यावरून महाविकास आघाडीतील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद सुरू झाले. प्रत्यक्षात २२ जुलै २०२१ रोजीच्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या पोलादपूर तालुक्यातील इतर नळपाणी पुरवठा योजनांकडे दूर्लक्ष करण्यासाठीच हा वाद घातला जात होता, हे महाड, पोलादपूर, माणगांव तालुक्यातील जनतेला जाणवत असल्याचे दिसून येत आहे.





# गुरव समाजातील तरुणांनी उद्योजक बनावे –बंडू खंडागळे

**पेण : प्रतिनिधी**

समाजातील तरुणांनी उद्योजक बनावे, त्यासाठी त्यांना संघटनेच्या वतीने मदत करण्यात येईल, अशी ग्वाही गुरव समाज ठाणे–रायगड–मुंबई या संस्थेचे अध्यक्ष बंडू खंडागळे यांनी पेण येथे दिली.

गुरव समाज ठाणे–रायगड–मुंबई या संस्थेची सभा पेण पी. के. रिसॉर्ट येथे झाली. त्यावेळी बंडू खंडागळे बोलत होते. समाज संघटनेत आता युवा पिढीला स्थान देणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

बारा बलुतेदारांमध्ये गुरव समाजाची संख्या नगण्य आहे. त्यामुळे गुरव समाजाने एकत्र येणे आणि संघटना मजबूत करणे गरजेच आहे. केवळ गुरवकीवर अवलंबून न राहता युवकांनी शिकून नोकरी किंवा उद्योग करावा, असा सल्ला संस्थेचे सल्लागार दत्ताजीराव मसुरकर यांनी दिला.

नवीन सभासद बनविणे, गुरव जोडो अभियान राबविने, नवीन सभागृह उभारण्यासाठी निधी उपलब्ध करणे, रायगड–ठाणे–मुंबई कार्यक्षेत्रातील समाजबांधवां सोबत गाव बैठका घेणे, तसेच मे महिन्याच्या अखेरीस समाजाच्या महामेळाव्याचे आयोजन करणे या बाबत या सभेत चर्चा झाली. संस्थेचे पदाधिकारी व स्थानिक समाज बांधव या वेळी उपस्थित होते.

# पेण शहरात श्रीसदस्यांनी गोळा केला ६२ टन कचरा

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे मंगळवारी पेण शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी तालुक्यातील पेण, दादर वरवणे, सापोली, हनुमानपाडा, वरसई, धावटे, वाशीनाका, रावे, वडखळ, आंबिवली, जिते, शिर्की या १५ बैठकांतील १०३४ श्रीसदस्यांनी ६२ टन सुका व ओला कचरा केला गोळा केला.

पेण शहरातील तहसील व प्रांताधिकारी कार्यालय, पोलीस ठाणे, फौजदारी व दिवाणी न्यायालय, एसटी बस स्थानक, रामवाडी बस स्थानक, एसटी विभागीय कार्यालय, उपजिल्हा रुग्णालय, रेल्वे स्टेशन, वैकुंठ धाम स्मशानभूमी परिसर तसेच पेण न्यायालय ते बस स्थानक, हनुमान मंदिर ते चावडी नाका, तहसीलदार कार्यालय ते म्हाडा कॉलनी, नंदिमाळ नाका, नगरपालिका चौक ते चिचपाडा, प्रायव्हेट हायस्कूल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्मशानभूमी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा, रायगड बाजार ते चिंचपाडा, अंतोरे फाटा ते नगरपालिका चौक, एसटी बस स्थानक ते चावडीनाका, आदी ठिकाणी स्वच्छता करून ४० टन ओला २२ टन सुका असा एकूण ६२ टन कचरा गोळा केला. हा कचरा ११ ट्रॅक्टर एक डंपर, १५ पिकअप व्हॅन,१२ टम्पो यांच्या सहाय्याने शहराबाहेरील डम्पिंग ग्राउंड येथे जमा करण्यात आला.

(छाया : अनिस मनियार)



श्रीसदस्यांच्या या स्वच्छता अभियानात नगर परिषदेचे मुख्याधिकारी जीवन पाटील, आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण, आरोग्य कर्मचारी रमेश गुप्ता, गौतम मोरे, गणेश सारंगकर, नॅशनल हायवेचे उप मुख्यकार्यकारी अभियंता रवींद्र कदम, दुय्यम निबंधक सोनाली पिंपळे, मंडळ अधिकारी प्रकाश मोकल, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. अतुल भगत, परिचारिका गीता भौड, अस्मिता भगत, वनरक्षक निलेश वारडे, सोनाली वाळके, प्रियंका सापते यांच्यासह श्री सदस्य सहभागी झाले होते.

# माणगाव झाले चकाचक; ३४ टन कचरा जमा

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भुषण तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मंगळवारी श्रीसदस्यांनी माणगावात स्वच्छता अभियान राबविले. या अभियानामध्ये ३४ टन कचरा गोळा करून तो डम्पिंग ग्राउंडमध्ये टाकण्यात आला.

माणगाव तहसील कार्यालयापासून सकाळी ७.३० वाजता या स्वच्छता अभियानाला सुरूवात झाली. शासकीय, निमशासकीय कार्यालय परिसर, सार्वजनिक ठिकाणे,रस्त्याच्या दुतर्फा तसेच कालवा परिसर याठिकाणी श्री सदस्यांनी ओला व सुका कचरा गोळा करून माणगाव शहर चकाचक केले. त्यासाठी ३१ वाहनांचा वापर करण्यात आला. या अभियानाला नगरपंचायत कार्यालयाचे विशेष सहकार्य लाभले.

(छाया : सलीम शेख)



उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील, भाजप तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष सचिन बोंबळे, पाणीपुरवठा सभापती राजेश मेहता, स्वच्छता सभापती अजित तार्लेकर, नगरसेवक आनंद यादव, राजिपचे माजी सभापती ॲड. राजीव साबळे, नायब तहसीलदार बी. वाय. भाबड, पं.स. माजी सभापती संगिता बक्कम, एसटी आगार प्रमुख चेतन देवधर, रेल्वे स्टेशन मास्टर कैलास मीना आदींसह पत्रकार आणि शेकडो श्रीसदस्य हातात झाडू, खराटा घेऊन या स्वच्छता अभियानात सहभागी झाले होते.

# वावोशीत स्वच्छता अभियान

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील वावोशी परिसरातील श्रीसदस्यांनी मंगळवारी सार्वजनिक ठिकाणे, शासकीय कार्यालये आणि परिसराची स्वच्छता केली.

वावोशी परिसरातील श्रीसदस्यांची जांभिवली येथे बैठक होत असते. या श्रीसदस्यांनी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मंगळवारी वावोशी परिसरातील जिल्हा परिषद शाळा, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती विद्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, पोलीस दुरक्षेत्र तसेच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान राबविले. या अभियानात वावोशी, शिरवली, परखंदे, गोरठण, होराळे, जांभिवली, नंदनपाडा, वनवठे, आपटी, झाडाणी, डोणवत, नारंगी, तोंडली, स्वाली, गोठिवली, खरिवली, गोहे, करंबेळी, चिलठण येथील श्रीसदस्यांनी श्रमदान केले.

(छाया : अरूण नलावडे)



# पोलादपुरात श्रीसदस्यांची स्वच्छता मोहीम

**काम स्तुत्यच –तहसीलदार देसाई**





(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

स्व. नानासाहेब धर्माधिकारी जन्मशताब्दी दिनानिमित्त श्रीसदस्यांनी संपूर्ण पोलादपूर शहरात स्वच्छता मोहीम राबविली. हे काम स्तुत्यच आहे, असे मत पोलादपूरच्या तहसीलदार दिप्ती देसाई यांनी मंगळवारी व्यक्त केले.

पोलादपूर तालुक्यातील श्रीसदस्यांनी मंगळवारी सकाळपासून सुरू केलेल्या शहर स्वच्छता मोहिमेचा समारोप तहसील कार्यालयाच्या प्रांगणात झाला. त्यावेळी तहसीलदार देसाई बोलत होत्या. श्रीसदस्य यशवंत कासार यांनी, प्रास्ताविकामध्ये प्रतिष्ठानच्या माध्यमातून श्रीसदस्यांनी डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविलेल्या कामांचा आढावा घेतला.

पोलादपूर तालुक्यात वनराई बंधारे, विहिर गाळ उपसा आणि बोअरवेल जलपुनर्भरणाचे तसेच स्वच्छता अभियानाचे काम श्रमदानाने करून श्रीसदस्यांनी जागतिक स्तरावर लक्ष्यवेधी कार्य केले आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनी काढले. उपनगराध्यक्ष नागेश पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. नगराध्यक्ष सोनल गायकवाड, माजी नगराध्यक्षा अश्विनी गांधी, प्रकाश गायकवाड, नगरसेवक प्रसाद इंगवले व अस्मिता पवार, नगरपंचायतीचे अधीक्षक महादेव सरंबळे यांच्यासह अन्य मान्यवर या वेळी उपस्थित होते.

मंगळवारी सकाळी पोलादपूर एसटी स्टँडपासून स्वच्छता मोहीम सुरू केल्यानंतर श्रीसदस्यांनी पंचायत समिती कार्यालय, श्रीकाळभैरवनाथ मंदिर, रयत शिक्षण संस्थेचे विद्यामंदिर, ग्रामीण रूग्णालय, डॉ. आंबेडनगर, बाजारपेठ, कृषी विभाग कार्यालय, पोलीस ठाणे, नगरपंचायत, कोषागार व तहसील कार्यालयाच्या परिसराची स्वच्छता केली. संपूर्ण स्वच्छता अभियानाचे सूत्रसंचालन प्रतिष्ठानचे समीर गांधी यांनी केले.

## आरोग्य प्रहर

# ...अन्यथा लिव्हर होऊ शकते खराब!

आपले शरीर निरोगी राहण्यासाठी लिव्हर अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतो.आपल्या शरीरातील वेगवेगळ्या रसायनांना नियंत्रण ठेवण्यास सोबतच पित्ताची निर्मिती सुद्धा लिव्हरच्या माध्यमातूनच होत असते. आपल्या शरीरातील लिव्हर अन्नपदार्थ मधून जे काही पोषक तत्व असतात ते शोषून घेण्याचे कार्य करतो आणि विषारी घटक बाहेर काढण्यासाठी लिव्हर मदत करत असतो त्याच बरोबर लिव्हर आपल्या शरीरातील फॅट निर्मिती करण्याचे कार्यदेखील करतो म्हणूनच बहुतेक वेळा आपल्या शरीरातील फॅट साठवण्याचे आणि मेटाबोलाइजेशनचे काम देखील लिव्हर करते. बहुतेक वेळा लिव्हरचे कार्य व्यवस्थित पार पडले नाही तर त्याचा विपरीत परिणाम कार्य गतीवर होतो. अशी काही लक्षणे दिसतात आपले लिव्हर भविष्यात खराब होऊ शकते. लिव्हर आपल्या शरीरातील महत्त्वपूर्ण अवयव असल्याने त्याची काळजीदेखील घेणे अत्यंत गरजेचे आहे.



**पोटामध्ये वारंवार वेदना जाणवणे–** पोटाच्या डाव्या बाजूला असणाऱ्या भागामध्ये वारंवार वेदना होणे हे लिव्हर खराब होण्याचे सूचक असते. जर या लक्षणांकडे आपण दुर्लक्ष केले तर भविष्यात आपले लिव्हर खराब सुद्धा होऊ शकते. बहुतेक वेळा सिरोसिस कारणामुळे सुद्धा लिव्हर वाढल्यास किंवा लिव्हर ला सूज आल्यास लिव्हर बिघडण्याची शक्यता असते यामुळे सुद्धा अनेकदा पोटात वेदना होतात.

**त्वचा पिवळी होते–** जेव्हा आपल्या शरीरातील लिव्हर योग्य पद्धतीने कार्य करत नाही अशा वेळी व्यक्तीला काविळीची लागण होण्याची शक्यता जास्त असते. रक्तामध्ये बिलीरुबिनची मात्रा वाढल्यामुळे अशी समस्यादेखील होते. बिलिरुबिन लाल रक्त पेशीमध्ये प्रामुख्याने आढळते. जेव्हा या पेशी नष्ट होतात तर लिव्हर यांना रक्त प्रवाह द्वारे फिल्टर करतो. लिव्हर मध्ये काही समस्या निर्माण झाल्यास रक्त या पेशींना व्यवस्थित फिल्टर करू शकत नाही, अशा वेळी बिलीरुबिनची मात्रा वाढून जाते. या कारणामुळे आपली त्वचा, डोळे यांचा रंग पिवळा होऊ शकतो.

**अचानक वजन कमी होण्याची समस्या–** लिव्हर आपल्या पचनसंस्थे संबंधित अत्यंत महत्त्वाचे कार्य बजावत असते. आपल्या शरीरातील लिव्हर व्यवस्थित कार्य करत नसेल तर आपल्याला भूक देखील लागत नाही. भूक न लागल्यामुळे आपण काही पदार्थ खात नाही, परिणामी आपले वजन कमी होते. जर तुम्हाला वरीलपैकी काही लक्षणे आढळून आल्यास या लक्षणांकडे अजिबात दुर्लक्ष करू नका.अन्यथा भविष्यात वेगवेगळ्या गंभीर आजारांना तुम्हाला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# महाडच्या विरेश्वर देवस्थानाला पर्यटनाचा दर्जा मिळवून देणार

## ▪ विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांची ग्वाही

(छाया : महेश शिंदे)



**महाड : प्रतिनिधी**

शिवकालीन जागृत देवस्थान असलेल्या महाडच्या विरेश्वर मंदिराला पर्यटनाचा दर्जा मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी येथे केले.

### छबिना उत्सवाला प्रारंभ

महाडचे ग्रामदैवत विरेश्वर देवस्थानच्या छबिना उत्सवाला शिवरात्रीपासून प्रारंभ झाला आहे. या मंदिराचा छबिना उत्सव कोकणात प्रसिद्ध आहे. विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी मंगळवारी विरेश्वराचे दर्शन घेतले त्या वेळी बोलते बोलत होते. पर्यटनाच्या माध्यमातून या देवस्थानाला प्रसिध्दी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करु असे त्यांनी सांगितले.

विरेश्वर मंदिर परिसराच्या सुशोभिकरणासाठी भाजप सरकारच्या काळात निधी दिला होता. मात्र महाविकास आघाडी सरकारच्या काळात या कामाला स्थगिती आली असून रखडलेले हे काम आपण पाठपुरावा करुन पुन्हा सुरू करू, असा विश्वासही दरेकर यांनी या वेळी व्यक्त केला.

भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, निलीमा भोसले, मंजुशा कुद्रीमोती, नाना पोरे, चंद्रजित पालांडे आदि या वेळी उपस्थित होते.

दरम्यान देवस्थानच्या वतीने दरेकर यांचा सत्कार करण्यात आला.



(छाया : धम्मशील सावंत)

# सुधागड कलमवाडीतील पाणी योजनेचे लोकार्पण



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर ग्रामपंचायत हद्दीतील कलमवाडी येथे स्वदेश फाउंडेशन व लोकवर्गणीतून नळ पाणीपुरवठा योजना उभारण्यात आली आहे. या योजनेचा लोकार्पण सोहळा नुकताच संपन्न झाला. या योजनेमुळे कलमवाडीतील ग्रामस्थांना नळाद्वारे शुद्धपाणी थेट घरापर्यंत मिळाले आहे.

या पाणीपुरवठा योजनेमुळे कलमवाडी ग्रामस्थांची पाण्याची समस्या कायमस्वरूपी मार्गी लागली आहे. तहसीलदार दिलीप रायण्णावार, सरपंच उमेश यादव, उपसरपंच योगेश सुरवकर, भाग्यश्री पाठारे, संतोष भोईर, स्वदेस फाउंडेशनचे दयानंद माने, ग्रामसेवक ए. टी. गोरड, रमेश पवार, कृष्णा वाघमारे, बबन वाघमारे, तुकाराम पवार, मंगेश यादव, गंगाराम सावंत, अंकेश पोंगडे, आशिष यादव, सतीश कदम, प्राची कदम, मनीषा पोंगड आदींसह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

सिद्धेश्वर कलमवाडी स्वदेस गावविकास समिती, दयानंद माने, राकेश बारस्कर, प्रवीण पाटील यांनी ही योजना कार्यान्वित करण्यासाठी मेहनत घेतली. नंदू पवार, तुळशीराम पवार, मालू पवार, रवींद्र यादव, सुनील पोगडे, गणेश यादव, कृष्णा वाघमारे यांनी सहकार्य करून ही योजना पूर्णत्वास नेली.

# रोह्यातील श्री राममंदिर ट्रस्टच्या अध्यक्षपदी जालिंदर शेवाळे



**रोहे : प्रतिनिधी**

शहरातील राममंदिर ट्रस्टच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते जालिंदर शांताराम शेवाळे यांची निवड करण्यात आली आहे.

रोह्यातील श्री राममंदिर ट्रस्टची बैठक नुकताच झाली. त्यात ट्रस्ट नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. त्यामध्ये अनंत गोपाळ साने (उपाध्यक्ष), संजीव कृष्णाजी कवितके (सचिव), उमेश गजानन जोशी (खजिनदार) यांचा समावेश आहे. तर जगदिश दामाणी, माधवराव भावे, ॲड. सुनिल सानप, संदीप गांगल, किरण बारटक्के, विशाखा बापट, विजया आठवले यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली.





(छाया : संतोष पेरणे)

# नेरळमध्ये भरवस्तीत दोन घरांमध्ये चोरी

**कर्जत : बातमीदार**

नेरळ शहरातील राम मंदिर व गंगानगर या भर नागरी वस्तीमधील दोन घरातील किमती वस्तू घेऊन अज्ञात चोरट्यांनी पोबारा केला.

नेरळच्या जुन्या बाजारपेठेतील राम मंदिराजवळ राहणारे हर्षद माणिकलाल शहा यांच्या घरी सायंकाळी सातच्या सुमारास चोरी झाली. घरातील तीन कपाटे फोडून चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरीला गेले आहेत.

नेरळ पूर्व परिसरात असलेल्या गंगानगर येथे अज्ञात चोरट्यांनी अनिल मसणे यांच्या घरात गॅलरीतून प्रवेश करत कपाटातील रोख रक्कमेसह सोन्याचे दागिने चोरून नेले. या घटनांबाबत नेरळ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# रायगडात महाशिवरात्र मोठ्या उत्साहात





**अलिबाग : प्रतिनिधी**

हिंदु धर्मातील सण उत्सवात महत्वाचे स्थान असणारी महाशिवरात्र रायगड जिल्ह्यात मंगळवारी (दि. १) मोठ्या उत्साहात साजरी झाली. जिल्ह्यात सर्वत्र बमबम भोलेचा गजर सुरू होता.

हर हर महादेवाच्या नामघोषाने शिवमंदिरे दणाणून गेली होती. ठिकठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी सकाळपासूनच शिवभक्तांची मंदिरामध्ये भाविकांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या.

दक्षिण काशी अशी ओळख असलेल्या श्री क्षेत्र हरिहरेश्वर (ता. श्रीवर्धन) येथील मंदिरात भाविकांनी गर्दी केली होती. मंदिरात फुलांची आरास करण्यात आली होती. महाडचे ग्रामदैवत श्री विरेश्वर महाराजांचा छबिना उत्सव मंगळवारपासून सुरू झाला आहे. तो चार दिवस चालणार आहे. जिल्हयातील शिवमंदिरांवर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. अलिबाग शहरातील श्री काशीविश्वेश्वर मंदिर, आंग्रेकालीन शिवमंदिर, उंच डोंगरावर असलेले श्रीक्षेत्र कनकेश्वर, रांजणखार येथील भुवनेश्वर, अलिबागनजिक गोकुळेश्वर, सिध्देश्वर, महाडचे श्री विरेश्वर, चौलमधील रामेश्वर, सोमेश्वर, गोरेगाव येथील श्री मल्लिकार्जून मंदिर, पेणचे श्री पाटणेश्वर, नवगाव येथील श्री बोरेश्वर मंदिर येथे भाविकांची गर्दी होती. शिवपिंडीवर दुग्धाभिषेक, बेलपत्र वाहण्यासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या.

रायगड जिल्ह्यात गावागावातील शिवमंदिरामध्ये पहाटेपासूनच ओम नमः शिवायचा गजर सुरू झाला. सफेत वस्त्र परिधान करून ओलेत्याने शिवदर्शन घेणाऱ्या भाविकांची संख्याही मोठी होती. मंदिरांमध्ये रूद्राभिषेक, अभिषेक, पूजा, भजन, किर्तन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे त्याचबरोबर महाप्रसादाचेदेखील आयोजन करण्यात आले होते. पूजेसाठी लागणाऱ्या साहित्याची दुकाने मंदिरांबाहेर थाटण्यात आली होती. शिवमंदिरांमध्ये शिवनामाचा गजर केला जात होता. ओम नमः शिवाय बम बम भोले चा जयघोष शंखनादात सुरू होता.

महाशिवरात्री निमित्त ठिकठिकाणच्या शिवमंदिरांमध्ये भजन, कीर्तन, पूजाअर्चा अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अलिबाग शहरातील जोगळेकर नाका येथे महाशिवरात्रनिमित्त कमळ नागरी पतसंस्थेने अखंड भजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. नामांकित भजन मंडळांनी आपल्या सुश्राव्य भजनांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

# कळंब आऊट पोस्ट चौकीत महापूजा

**कर्जत : बातमीदार**


नेरळ पोलीस ठाण्याच्या कळंब आऊट पोस्ट पोलीस चौकीत मंगळवारी महाशिवरात्री निमित्त महापूजा आयोजित केली होती. दिवसभर भजन, हरिपाठ, कीर्तन माध्यमातून समाजप्रबोधन करण्यात आले.

कळंब येथील पोलीस चौकीत ग्रामीण भागात असून कळंब चौकी अंतर्गत सुमारे ६० गावे येतात. नेरळ पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी राजेंद्र तेंडुलकर, कर्जत पोलीस स्टेशनच्या निरीक्षक सुवर्णा पत्की, कळंब दुरक्षेत्रचे अंमलदार निरंजन दवणे, विद्या चव्हाण, भरत गर्जे, जिल्हा विशेष शाखेचे दिंडे, समीर भोईर, निलेश वाणी, मनीष खुणे यांच्यासह दुरक्षेत्र हद्दीत सर्व पोलीस पाटील या महापूजेला उपस्थित होते.

परिसरातील वारे, खैरपाडा, हरिपाठ मंडळ, कळंब भजनी मंडळ, खांडस, सुतारपाडा, चाफेवाडी, हरिपाठ मंडळ यांनी भजन आणि हरिपाठ सादर केले. रात्री हभप हरिचंद्र महाराज जाधव यांचे कीर्तन झाले.



(छाया : सलीम शेख)





# कर्जतमध्ये शांती पदयात्रा

**कर्जत : प्रतिनिधी**

प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयातर्फे कर्जतमधील कपालेश्वर मंदिरात त्रीदिवसीय महाशिवरात्र पर्व आयोजीत करण्यात आले होते. त्या निमित्त मेणबत्ती घेऊन शहरात शांती पदयात्रा काढण्यात आली होती.

कर्जत शहरातील हनुमान मंदिर येथून पदयात्रेचा शुभारंभ करण्यात आला. पुढे कपालेश्वर मंदिर, कर्जत रेल्वे स्टेशन, महावीर पेठ, इंग्लिश मीडियम स्कूल, अमराई कोतवाल नगर, म्हाडा कॉलनी, पोलीस ग्राउंड, डॉ. आंबेडकर चौक, नगरपालिका कार्यालयमार्गे पदयात्र पुन्हा हनुमान मंदिराजवळ आली. तेथे पदयात्रेचा समारोप करण्यात आला. प्रजापिता ब्रम्हकुमारीचे अनुयायी या पदयात्रेत सहभागी झाले होते.

# माणगावातील संगमेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी



**माणगाव : प्रतिनिधी**

येथील संगमेश्वर मंदिरात मंगळवारी महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कोविड नियमांचे पालन करीत सुरक्षित अंतर ठेवून भाविकांनी मंदिरात दर्शन घेतले.

पहाटे अभिषेक झाल्यानंतर भक्तगण दिवसभर मंदिरात दर्शनासाठी भाविक येत होते. सायंकाळी महाआरती घेण्यात आली. मंदिर परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा रांगोळी काढण्यात आली होती.

मंदिराच्या गाभाऱ्यात प्रसाद खरे, सचिन गोरेगावकर यांनी उत्तम अशी सजावट केली होती.


## सावधान नोटीस

## CAUTION NOTICE

**भूखंडाचे वर्णन**

मौजे – पुष्पकनगर नोड (दापोली), तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड.

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर – दापोली | ८ | १०१ | ४४५० चौ.मी. |

माझे अशिल **मे. नेक्सस इन्फ्रा भागीदारी संस्थेतर्फे भागीदार – १) श्री. प्रतापसिंह रविंद्र देशमुख २) श्री. निलेश हरजी भाटेसरा** राहणार : प्लॉट नं. १०, ११, प्रतिक जेम्स, पर्ल ६०३, सेक्टर नं. ३५, कामोठे, नवी मुंबई यांच्यावतीने सदर खबरदारीचे नोटीसीने/सावधान नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की,

मूळ जमीन मालक/भूखंडधारक १) श्री. हरी शंकर मेहेर २) श्रीमती कृष्णाबाई रामचंद्र आवासकर ३) श्रीमती ताराबाई शांताराम दळवी ४) श्री. निलेश हरी मेहेर ५) श्री. दिनानाथ अंबाजी मढवी ६) श्रीमती पुष्पा भास्कर जोशी ७) श्री. मथुरा अरूण कोळी ८) श्रीमती वत्सला महेंद्र तांडेल ९) श्रीमती जयश्री अंबाजी मढवी १०) श्री. वसंत नारायण मेहेर ११) श्री. यशवंत नारायण मेहेर १२) श्री. रामनाथ नारायण मेहेर १३) श्री. बेबीबाई पांडुरंग राऊत उर्फ भगत १४) श्रीमती रमाबाई तुकाराम तारेकर १५) श्रीमती वत्सला वसंत दळवी नं. १,२,४,१० ते १५ सर्व राहणार मु. पो. पारगाव, ता. पनवेल, जि. रायगड, नं. ३ राहणार : मु. बोनकोडे, ता.जि. ठाणे, नं. ५, ६, ८ व ९ सर्व राहणार : सारसोळे, ता. व जि. ठाणे, नवी मुंबई नं. ७ राहणार मु. करंजे, ता. उरण, जि. रायगड (सोईकरीता श्री. हरी शंकर मेहेर व इतर यांना यापुढे ''मूळ भूखंडधारक'' असे संबोधण्यात आलेले आहे) यांना त्यांच्या संपादीत मिळकतीच्या मोबदल्यात शासनाच्या साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वर नमूद वर्णनाचा भूखंड वाटप करण्यात आलेला आहे.

वर नमूद करण्यात आलेला भूखंड हा मूळ भूखंडधारक यांनी माझे अशिल **मे. नेक्सस इन्फ्रा भागीदारी संस्थेतर्फे भागीदार – १) श्री. प्रतापसिंह रविंद्र देशमुख २) श्री. निलेश हरजी भाटेसरा** यांना दिनांक १३/०४/२०१७ रोजीच्या ''विकसन कराराद्वारे'' डेव्हलमेंटकरिता दिलेला आहे. सदर कराराच्या अनुषंगाने मूळ भूखंडधारक व त्यांचे वारसांना माझे अशिलांनी वेळोवेळी बांधकामाव्यतिरिक्त ठरलेल्या पैशाचे मोबदल्याची मोठी रक्कम दिलेली आहे. तसेच करारात ठरल्याप्रमाणे बांधकाम स्वरुपाचा मोबदला देण्यास तयार होते व आहेत व अशाप्रकारे सदर वर नमूद भूखंडामध्ये माझे अशिलांचा हक्क व हितसंबंध निर्माण झालेला आहे.

परंतु वर नमूद केल्याप्रमाणे मूळ भूखंडधारक – श्री. हरी शंकर मेहेर व इतर यांनी माझे अशिलांबरोबर सदर वर नमूद भूखंडाचा रितसर करार केलेला असताना तसेच तो आजही अस्तित्वात असतानादेखील मूळ भूखंडधारक – श्री. हरी शंकर मेहेर व इतर हे सदर वर नमूद भूखंडामध्ये परस्पर संगनमताने तिऱ्हाईत विकासकाचे तिऱ्हाईताचे हक्क–हितसंबंध निर्माण करण्याचे प्रयत्न करीत असून सदर वर नमूद भूखंडावर इमारत बांधणार असल्याचे सांगून बेकायदेशीरपणे नियोजित इमारतीमधील सदनिका आणि वाणिज्य गाळे हे तिऱ्हाईत खरेदीदारांना परस्पर विक्री करीत असल्याचे/बुकींगची रक्कम स्विकारून त्यांची फसवणूक करीत असल्याचे माझे अशिलांच्या निर्दर्शनास आलेले आहे.

तरी सदर जाहीर नोटीसीद्वारे माझे वर नमूद अशिलांचे वतीने मी ॲड. जे. डी. पाटील सर्व लोकांस या नोटीसीद्वारे कळवितो की, वर नमूद मूळ भूखंडधारक – श्री. हरी शंकर मेहेर यांच्याशी अगर त्यांचे वाली वारस, एजंट, मुखत्यारी वगैरे कोणाशीही वर नमूद भूखंडाबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये किंवा सदर भूखंडावरील नियोजित इमारतीमधील कोणत्याही प्रकारची सदनिका किंवा वाणिज्य गाळे खरेदी करू नये किंवा कोणत्याही प्रकारची बुकींग/मोबदल्याची रक्कम मूळ भूखंडधारक किंवा अन्य कोणत्याही विकासक यांना देवू नये. याहून उपर वर नमूद भूखंडाबाबत किंवा भूखंडावरील नियोजित इमारतीमधील सदनिका/वाणिज्य गाळे यांबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास, अगर सदनिका आणि वाणिज्य गाळे बुकींगची रक्कम दिल्यास असा कोणताही व्यवहार/करार – दस्त, बुकींग अगर दिलेली रक्कम माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व अशावेळी संबंधितांना होणाऱ्या कोणत्याही फसवणुकीस किंवा नुकसानास माझे अशिल जबाबदार असणार नाहीत याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण – पनवेल**
**दिनांक : ०२/०३/२०२२**

**सही/–**
**ॲड. जे. डी. पाटील**
कार्यालयीन पत्ता : ऑफीस नं. ७ व ८,
मुनोथ रेसिडेन्सी, डी मार्ट रेडीजवळ,
जुना ठाणा नाका रोड, पनवेल, तालुका – पनवेल,
जिल्हा – रायगड, ४१० २०६

## राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# नांदेडचे दोन्ही संघ बाद फेरीत

**भिवंडी : प्रतिनिधी**

मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, रत्नागिरी, सांगली, कोल्हापूर, धुळे, नांदेड यांनी ६९व्या वरिष्ठ गट पुरुष व महिला गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या दोन्ही गटात बाद फेरी गाठली. गेली कित्येक वर्षे तळाचे मानांकन असणाऱ्या नांदेडच्या दोन्ही संघांनी यंदा बाद फेरी गाठण्याचा मान मिळविला. तर नंदुरबार, अहमदनगर, नाशिक यांनी पुरुषांत, तर रायगड, पालघर, औरंगाबाद यांनी महिलांत बाद फेरी गाठत आपले आव्हान जिवंत ठेवले.



काल्हेर भिवंडी येथील बंदऱ्या मारुती क्रीडानगरीत सुरू असलेल्या पुरुषांच्या अ गटात गतविजेत्या रत्नागिरीने आपले अव्वल स्थान टिकविताना नांदेडला चुरशीच्या लढतीत ३०–२८असे नमवले. मध्यांताराला १६–१२ अशी आघाडी घेणाऱ्या रत्नागिरीला नांदेडने विजयासाठी शेवटच्या क्षणापर्यंत झुंजविले. अजिंक्य पवार या विजयाचा शिल्पकार ठरला. नांदेडचा विकास काळे एकाकी लढला. नांदेडने उपविजेते म्हणून बाद फेरी गाठली.

पुरुषांच्या ब गटात मुंबई शहर व अहमदनगर हा सामना बरोबरीत सुटल्याने दोन्ही संघाचे समान(५–५) साखळी गुण झाले. पण मिळविलेल्या व गमावलेल्या फरकात मुंबईचे पारडे जड ठरले. मुंबईचे अधिक ३१, तर नगरचे अधिक २३ गुण फरक आल्याने या गटात मुंबईने प्रथम, तर नगरने दुसरे स्थान मिळविले. क गटात नंदुरबारने नाशिकचा २९–२६ असा पराभव केला. या विजयाने नंदुरबार या गटात अव्वल ठरले. नाशिकच्या या पराभवामुळे नाशिक व रायगड यांच्यात ३–३ असे समान साखळी गुण झाले. यातील गुण फरकात नाशिकची उणे ३, तर रायगडची उणे ५ फरक आला. त्यामुळे नाशिक बाद फेरीत दाखल झाला तर रायगडला साखळीतच आपला गाशा गुंडाळावा लागला. ड गटातून धुळे प्रथम तर सांगली दुसऱ्या क्रमांकाने बाद फेरीत दाखल झाले. इ गटात मुंबई उपनगरने यजमान ठाण्याला ३१–१७ असे पराभूत करीत या गटात विजेतेपद प्राप्त केले, तर ठाण्याने दुसरा क्रमांक मिळवीत बाद फेरी गाठली. उपनगरच्या या विजयात आकाश गायकवाड, अभिषेक नर चमकले. ठाण्याचा परेश हरड एकाकी लढला. फ गटात पुण्याने हिंगोलीला चुरशीच्या लढतीत ४९–४२ अशी धूळ चारत या गटात अपराजित रहात अव्वल स्थान पटकावले.

महिलांच्या अ गटात गतविजेत्या पुण्याने सोलापूरवर ६९–१३ असा विजय मिळवीत गटात प्रथम स्थान मिळविले. पूजा शेलार, निकिता पडवळ या विजयात उत्तम खेळल्या. सांगली या गटात दुसऱ्या स्थानी राहिली. ब गटात मुंबई शहरने रायगडला ४३–२४ असे पराभूत करीत अव्वल नंबर घेतला. रायगड दुसऱ्या क्रमांकाचा संघ ठरला. पूजा यादव, मेघा कदम, पौर्णिमा जेधे यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. रायगडची रचना म्हात्रे चमकली. महिलांच्या क गटात मुंबई उपनगर कडून यजमान ठाण्याला या गटात उपविजेत्या पदावर समाधान मानावे लागले. उपनगर या गटात अव्वल ठरली. इ गटात नांदेडने औरंगाबादचा २८–१३असा पाडाव करीत प्रथम स्थान प्राप्त केले. औरंगाबाद दुसऱ्या स्थानी ढकलले गेले. अरुणा पोवार, अनुराधा यांच्या नेत्रदीपक खेळाने नांदेडनी ही विजयाची किमया साधली.

## श्रीलंकेविरुद्ध कसोटी मालिकेसाठी टीम इंडियामध्ये चुरस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारत आणि श्रीलंका यांच्यातील टी–२० मालिकेनंतर आता उभय संघांमध्ये कसोटी मालिका रंगणार आहे. फॉर्ममध्ये असलेल्या टीम इंडियामध्ये स्थान मिळविण्यासाठी खेळाडूंमध्ये चुरस दिसून येत आहे.

रोहित शर्मा प्रथमच भारताच्या कसोटी क्रिकेट संघाची धुरा सांभाळण्यासाठी सज्ज होत असताना मधल्या फळीतही नवे बदल अपेक्षित आहेत. चेतेश्वर पुजारा आणि अजिंक्य रहाणे यांच्या जागी शुभमन गिल आणि हनुमा विहारी हे पर्याय श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत आजमावले जाण्याची शक्यता आहे. पुजारा आणि रहाणे यांची श्रीलंकेविरुद्धच्या दोन आणि इंग्लंडविरुद्धच्या एक अशा एकूण तीन कसोटी सामन्यांसाठी निवड केली जाणार नाही. केपटाऊनला भारतीय संघ अखेरचा कसोटी सामना खेळल्यानंतर संघात दोन जागा रिक्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर गिल आणि विहारी यांच्याशिवाय श्रेयस अय्यर असे तीन पर्याय उपलब्ध आहे. त्यामुळे प्रशिक्षक राहुल द्रविड कोणती रणनीती आखतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

मोहालीत ४ मार्चपासून सुरू होणारी श्रीलंकेविरुद्धची पहिली कसोटी ही विराट कोहलीच्या कारकीर्दीतील १००वी कसोटी आहे. या सामन्यात रोहित आणि मयांक अगरवाल सलामीला उतरतील, तर तिसऱ्या क्रमांकावर गिल आणि चौथ्या क्रमांकावर विराट फलंदाजीला येऊ शकतो.

## मुंबईच्या सिद्धार्थ मोहितेचा अनोखा विश्वविक्रम

### नेट्समध्ये ७२ तास पाच मिनिटे सलग फलंदाजी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईचा युवा क्रिकेटपटू सिद्धार्थ मोहितेने दीर्घ काळ फलंदाजी करीत गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आपले नाव नोंदवले.त्याने नेट्समध्ये ७२ तास पाच मिनिटे सलग फलंदाजी केली.

याआधी क्रिजवर सतत फलंदाजी करण्याचा विक्रम विराग माने यांच्या नावावर होता. त्यांनी २०१५ साली ५० तास फलंदाजी केली होती, मात्र १९ वर्षीय सिद्धार्थ मोहितेने आता त्यांचा विक्रम मोडला आहे. या विक्रमाच्या वेळी सिद्धार्थ मोहितेला मार्गदर्शक ज्वाला सिंग यांनी मार्गदर्शन केले. ज्वाला यांनी यापूर्वी राजस्थान रॉयल्सचा सलामीवीर फलंदाज यशस्वी जयस्वाललाही प्रशिक्षण दिले आहे.



**मला नेहमीच काहीतरी वेगळे करण्याची इच्छा असते. मी जे करण्याचा प्रयत्न करत होतो ते मी करू शकलो याचा मला खूप आनंद आहे.**
**–सिद्धार्थ मोहिते**

## महिला टीम इंडियाचा विंडीजवर सराव सामन्यात विजय

**रँगिओरा (न्यूझीलंड): वृत्तसंस्था**

सलामीवीर स्मृती मानधनाची अर्धशतकी खेळी (६६) आणि शिस्तबद्ध गोलंदाजीच्या बळावर भारताने अखेरच्या सराव सामन्यात वेस्ट इंडिजवर ८१ धावांनी विजय मिळवला. त्यामुळे विश्वचषक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर भारताचा आत्मविश्वास उंचावला आहे.



दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सराव सामन्यात स्मृतीच्या डोक्यावर चेंडू आदळला होता. त्यामुळे तिला रुग्णालयात डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. मंगळवारी भारताने ५० षटकांत २५८ धावांचे आव्हान उभे केले. यात स्मृतीचे महत्त्वाचे योगदान होते. त्यानंतर भारतीय गोलंदाजांना ९ बाद १७७ धावसंख्येवर रोखले. येत्या रविवारी भारत–पाकिस्तान लढतीने महिला विश्वचषक अभियानाला प्रारंभ होत आहे.

## खोपोलीमध्ये रायगड जिल्हा पावरलिफ्टिंग निवड चाचणी स्पर्धा

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

केएमसी कॉलेज खोपोली येथे जिल्हास्तरीय क्लासिक निवड चाचणी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत मुलींच्या गटात अमृता भगत, मुलांच्या गटात प्रथमेश भालेकर आणि सिनिअर गटात अक्षय शनमुगम हे विजयी झाले.

या स्पर्धेत अनेक मान्यवर पंच आले होते. यामध्ये प्रामुख्याने मधुकर पाटकर (श्री शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त, ठाणे), सतिष पाताडे (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त), संजय रहाटे (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त), संतोष बांद्रे (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त), गोपीनाथ पवार (आंतरराष्ट्रीय पदक विजेते), स्वप्नील पाटील(ठाणे), विनायक कारभारी (ठाणे जिल्हा अध्यक्ष) आणि सुश्मिता देशमुख (आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त) यांनी काम पाहिले.



मदतनीस म्हणून बुधाजी कांबळे (मुंबई), राजबहादूर शर्मा (मुंबई), प्रज्ञा पवार (महाड) यांनी काम केले. या स्पर्धेचे आयोजन रायगड पावरलिफ्टिंगचे अध्यक्ष गिरीष वेदक यांच्या मार्गदर्शनानुसार सहसचिव सचिन विठ्ठल भालेराव यांनी राहुल गजरमल, विनायक पाटील, प्रा. माने सर, राजेश अंगत यांच्या सहकार्याने केले होते. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ ज्येष्ठ क्रीडा कार्यकर्ते शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त मारुती आडकर यांच्या हस्ते झाला.



## पेणच्या खेळाडूंची सुवर्ण झेप

**पेण : प्रतिनिधी**

युनिफाईट वेलफेअर असोसिएशन महाराष्ट्र व युनिफाईट वेलफेअर असोसिएशन सातारा यांच्या वतीने सातारा वाई येथे नुकतीच ९ व्या राजस्तरिय युनिफाईट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये पेणच्या खेळाडूंची सुवर्ण कामगिरी केली आहे.

पेण, जोहे, जिते येथील युनायटेड शोतोकान कराटे असोशिएशन ह्या संस्थेत शिहान रविंद्र म्हात्रे व सेन्साय प्रथमेश मोकल ह्यांच्या कडे युनिफाईट ह्या खेळाचे प्रशिक्षण घेत असलेले खेळाडू रितुल रविंद्र म्हात्रे, यश उदय जोशी, वंश संजय घरत, श्रीतेज मोरेश्वर पाटील, दिपेंद्र दीपक सावंत ह्या चारही खेळाडूंनी सुवर्ण पदक पटकावून रायगड जिल्ह्यासोबत पेण तालुक्याचे नाव उंचावले आहे.

या स्पर्धेचे बक्षिस वितरण प्रमुख पाहुणे सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी युवराज नाईक, युवा नेते ईशान भोसले, महाराष्ट्र युनिफाईटचे अध्यक्ष संतोष खंदारे सर, सचिव डॉ. मंदार पनवेलकर, सातारा युनिफाईटचे अध्यक्ष संदिप भाऊ शिंदे, सचिव नितीन तसेच जिल्ह्यातील सन्मानिय मान्यवर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. विजय स्पर्धकांची हिमाचल प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत करण्यात येत आहे.









**पनवेल : महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी महानगरपालिका व प्रजापिता ब्रम्हकुमारी यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्य गर्भसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी केंद्रिय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील यांच्यासह नगरसेविक, नगरसेविका आदी उपस्थित होते.**





पनवेल : महाशिवरात्रीनिमित्त नेरे येथे कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जय हनुमान कुस्तीगीर संघ नितळस तालमीचे पैलवान रुपेश पावशे यांचा शिष्य कल्पेश बाळाराम पाटील याला प्राचीन केसरी ही मानाची गदा मिळाली. याबद्दल त्याचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन केले. या वेळी नगरसेवक अमर पाटील, भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, भाजप युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, आंतरराष्ट्रीय खेळाडू पैलवान रुपेश पावशे यांच्यासह राष्ट्रीय खेळाडू पैलवान साजन पावशे व पैलवान संतोष गोंधळी उपस्थित होते.



उरण : जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून भेंडखळ येथील बाल्मर लॉरी सी. एफ. एस. येथील पर्ल फ्रेट सर्व्हिसेसमधील कामगारांना भरघोस पगारवाढ तसेच सुविधा देण्याचा करार झाला आहे. याकामी मार्गदर्शन करणारे आमदार महेश बालदी यांचे तसेच संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांचे कामगारांनी आभार व्यक्त केले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com